शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

Estd-1962 - recognized by UGC U/s 2(f) and 12 (B)

NAAC "A" Grade

# ऑनलाईन परीक्षेसाठी सूचना

# परीक्षेचे स्वरूप

- परीक्षेसाठी बहुपर्यायी प्रश्न असतील (एमसीक्यू)
- परीक्षेची लिंक, लॉगिन आय डी व पासवर्ड ईमेल आणि एसएमएसद्वारे परीक्षेच्या अगोदर आपणास पाठविण्यात येतील.
- आपण  विद्यापीठाला  पाठविलेला ईमेल आणि फोन नंबर आपल्याशी संपर्क करण्यासाठी वापरण्यात येईल.
- आपल्या प्रवेशपत्रावर ( हॉल टिकेट) नमूद  परीक्षेच्या वेळापत्रकानुसार

  सदर दिवशी पंधरा मिनिटे अगोदर लॉगिन करू शकता.

# ऑनलाईन परीक्षेसाठी सिस्टमची आवश्यकता

- सुस्थितीतील लॅपटॉप, डेस्कटॉप संगणक किंवा, स्मार्ट मोबाईल फोन आपल्याकडे असणे  आवश्यक आहे (आपण विंडोज पीसी किंवा मॅक वापरू शकता). लॅपटॉप, स्मार्टफोन परीक्षेपूर्वी पूर्णतः चार्ज करण्याचीदक्षता घ्यावी.
- वरील कोणत्याही उपकरणाद्वारे आपण गुगल क्रोम ब्राउझरच्या माध्यमातून परीक्षा देवू शकता
- वरील उपकरणामध्ये योग्य असे इंटरनेट असणे आवश्यक आहे .
- आपल्या उपकरणामध्ये Google Chrome इंटरनेट ब्राउझर नसल्यास आपण तत्काळ  डाऊनलोड करून घ्यावा.

# आपण मॅक वापरकर्ता असल्यास - कृपया पुढील अतिरिक्त सूचना लक्षात ठेवाः

- Googlechrome.dmg फाईल डाउनलोड करा
- यावर डबल क्लिक करून हे अँप्लिकेशन इंस्टॉल करा.
- इन्स्टॉलेशन नंतर गूगल क्रोम अँप्लिकेशन फोल्डरमध्ये ठेवावा.



# वेब कॅमेऱ्या बाबत सूचना

१. आपण आपली परीक्षा सुरु केल्या बरोबर आपल्याला कॅमेरा संर्दभात संदेश दिसेल "Allow access to Web Camera" आपण "Yes" किंवा "No" यापैकी कोणताही एक पर्याय निवडून पुढे जाऊ शकता.

# ऑनलाईन परीक्षेसाठी महत्त्वपूर्ण सूचना

1. परीक्षेदरम्यान इतर कोणताही फोन कॉल किंवा काही संभाषण झाल्यास त्याची एक चेतावणी सूचना म्हणून नोंद होईल याची नोंद घ्यावी.
2. परीक्षार्थीने आपले पाठ्यपुस्तक, कोर्स नोट्स वापरावयाची नाहीत किंवा इतर कोणतेही बाह्य स्त्रोत कडून मदत घ्यावयाची नाही. तसे निर्देशनास आल्यास अशी बाब परीक्षा प्रमाद म्हणून नोंद करण्यात येईल.
3. परीक्षार्थीने 60 मिनिटांच्या मुदतीत परीक्षा पूर्ण करणे आवश्यक आहे.
4. परीक्षार्थीने परीक्षा मधेच थांबवून परत परीक्षा सुरु करू नये. सदरची परीक्षा online असल्याने वेळ संपल्यानंतर परीक्षा बंद होणार असल्याने आपल्याला परत login करता येणार नाही. टीव्ही, सोशल मीडिया किव्हा इतर माध्यम यांचे Notification बंद असल्याची खात्री करावी..
5. परीक्षार्थीने स्क्रीन स्विच करू नये किंवा परीक्षेच्या स्क्रीन व्यतिरिक्त इतर काही पाहू नये. असे केल्यास सिस्टम कदाचित आपली परीक्षा स्थगित करेल .
6. परीक्षा कालावधीच्या शेवटच्या 15 मिनिटांकरिता सिस्टम आपल्याला सतर्क करेल.

# ऑनलाईन परीक्षेसाठी महत्त्वपूर्ण सूचना

7. परीक्षेच्या वेळी वॉशरूम ब्रेक आणि स्नॅक ब्रेक तसेच अन्य ब्रेक घेण्याची परवानगी नाही.
8. परीक्षा स्क्रीनवरून इतर स्क्रीनवर जाण्याकरीता  अल्ट-टॅब, माउस किंवा इतर कोणत्याही डिव्हाइसचा वापर करु नका असे केल्याने आपली परीक्षा खंडित होऊ शकते.
9. परीक्षार्थ्यांनी आपल्या उपकरणाचे अँटीव्हायरस  अपडेट  / विंडोज अपडेट बंद ठेवावेत.
10. जर परीक्षार्थ्यास कनेक्टिव्हिटी, विदुयुत पुरवठा अथवा अन्य कारणास्थव खंडित झाल्यास परीक्षार्थीने निर्धारित वेळेत पुन्हा लॉगइन  करून सदरची परीक्षा पूर्ण करावी. यासाठी ३० मिनिटाचा अधिकचा कालावधी दिला आहे.
11. परीक्षेच्या उर्वरित वेळेसहित मागील सर्व तपशील स्वयंचलितपणे सिस्टममध्ये जतन केल्यामुळे परीक्षार्थी आपली परीक्षा जिथे थांबली आहे तेथून पूर्वीचेच लॉगिंग आयडी व पासवर्ड वापरून परीक्षा पुन्हा सुरू करू शकतो .

# शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

**आपण कोणतीही मदत घेऊ इच्छित असल्यास, कृपया खालील मदत क्रमांकावर कॉल करा क्रमांक विद्यापीठाच्या वेबसाइटवर प्रदर्शित केले आहेत**

**Kolhapur District 8806572633, 9730337456, 9075366506, 9657392706, 7218642037, 7588869781, 9923190294, 9168287191,**
**Satara District 8600222102, 9075210757, 9145601765, 7058323510, 8806345179, 9764482345,**
**Sangli District 7517625172, 9561353661, 7498564233, 7083110399, 9767586327, 8806903088**